# ई-साहित्यावरही पुणेकरांचे क्लिक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

ऑडिओ बुकचा प्रयोग तसा नवीन नाही. 'निवडक पु.ल.'च्या माध्यमातून पु.लंच्या साहित्याचा आपण दृकश्राव्य रसास्वाद घेतलाच आहे.. शिवाय अनेक साहित्यिकांचे साहित्य ध्वनिफितीच्या माध्यमातून श्रवणही केले आहे. पण, तंत्रज्ञानाच्या रेट्यामुळे हे सर्व आता कालबाह्य झाल्याने छापील पुस्तकांच्या पलीकडे ई-बुक हेच साहित्याचे भविष्य असेल. वाद नसणारे ई-साहित्य संमेलन, ई-दिवाळी अंक हे असेच काहीसे हटके प्रयोग !

घरामधील शेल्फबुक...त्यामध्ये दिग्गज साहित्यिकांची दर्जेदार पुस्तके...हे चित्र आणि या पुस्तकांतून वाटणारी श्रीमंतीची भावना ही पूर्वापार सुरू राहणार असली, तरी हे सर्व एका यंत्रात समाविष्ट होण्याचा हा काळ. मराठी साहित्याला वाहिलेल्या किमान वीस तरी वेबसाइट सध्या जोरात आहेत. पुस्तकांतील मौलिक साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध प्रयोग होताना दिसतात. मराठी साहित्य वैश्विक व्हावे, विदेशातील मराठीजनांपर्यंत तसेच बहुभाषिकांपर्यंत ते पोहचावे या साठी मोठ्या प्रमाणावर साहित्य ई-बुक स्वरूपात पुढे येऊ लागले आहे.



तरुण पिढी वाचत नाही, असा डांगोरा नेहमीच पिटला जातो. पुस्तकांची खरेदी करून तरुणाई या आरोपाला चांगलेच प्रत्युत्तर देते. मात्र, त्याच वेळी आजच्या तरुणाईचे भावविश्व ओळखून त्यांना पुस्तकांमधील मौलिक साहित्य ऑनलाइन स्वरुपात उपलब्ध करून दिले, तर त्यासही उदंड प्रतिसाद मिळतो आणि आजची पिढी वाचते ही खूणगाठ पक्की होते.

ई-बुक उपलब्ध करून देणाऱ्या 'स्नोवेल'चे समीर धामणगावकर यांनी या अनोख्या प्रयोगाविषयी 'मटा'ला माहिती दिली. ते म्हणाले, 'ऑडिओ बुक्स इतक्या संकुचित विचाराने याकडे न पाहाता श्राव्यानुभव म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. मराठी साहित्याला वाहिलेल्या किमान वीस तरी वेबसाइट सध्या असून, त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे. युनिक फिचर्स आणि बुगगंगाचे साहित्य संमेलन हा चांगला प्रयोग आहे. येथे वाद न होता संमेलने रंगतात. त्यामुळे विचारांचे आदानप्रदान होते.